# MAHARASHTRA STATE COUNCIL OF EXAMINATION, PUNE

Government Commercial Certificate Examination

**6 JULY, 2018**

[Time : 09-00]

(Total Marks for Sections I and II : 100)

## MARATHI TYPEWRITING

(40 Words Per Minute)

**SECTION - II**

(Time Allowed : 7 Minutes)

**मराठी टंकलेखन**

(४० शब्द प्रति मिनिट)

**विभाग - २**

(वेळ : ७ मिनिटे)

**सूचना :** गती उतारा एकदा टंकलिखित झाल्यावर पुन्हा तोच उतारा टंकलिखित करु नये. खालील मजकूर डाव्या बाजूस १५ पदे समास सोडून द्विपंक्ती (डबल लाइन स्पेसिंग) अंतराने टंकलिखित करा.

---

**[गुण :४०]**

भारताच्या सुदूर पूर्वेला असलेली अंदमान-निकोबारची बेटे म्हणजे रम्य हिरवा गर्द निसर्ग आणि सर्व बाजूंनी निळ्या हिरव्या पाण्याचा प्रचंड सागर असलेली अत्यंत रमणीय अशी पाचूची बेटे आहेत.

बऱ्याच लोकांना माहित नसेल, की अंदमान-निकोबारमध्ये ५७२ लहानमोठी बेटे आहेत. त्यापैकी फक्त ३०-३२ बेटांवर मनुष्यवस्ती आहे. आपण अंदमान-निकोबार असे म्हणत असलो तरी दोन्ही बेटांमध्ये खूप अंतर आहे. कार निकोबारला जायला एक रात्र, तर ग्रेट निकोबारला जायला दोन दिवस लागतात. ग्रेट निकोबार समूहातील इंदिरा पॉइंट हे भारताचे शेवटचे टोक इंडोनेशियाला जवळ आहे.

रात्री येथून जावा, सुमात्रा बेटांवरील दिवे दिसतात. निकोबार बेटावर थेट जाता येत नाही. अंदमानहून डेप्युटी कमिशनरची परवानगी घेऊनच निकोबारला जाता येते. अंदमानमध्ये फिरताना सतत एक प्रश्न मनात येतो की, अंदमान हा प्रदेश इतका सुंदर असताना सर्व जण अंदमानला काळे पाणी म्हणूनच जास्त का ओळखतात.

कलकत्ता किनारा सुटला की पुढे लांबच लांब समुद्र काळाच दिसायला सुरु होतो. स्वतंत्रता संग्रामात क्रांतिकारकांना शिक्षेसाठी अंदमानला पाठवण्यात आले. त्यांना भयानक छळाला तोंड द्यावे लागले. बरेच क्रांतिकारी प्राणाला मुकले. त्यामुळेसुद्धा अंदमान म्हणजे काळे पाणी, असे म्हणण्याचा प्रघात पडला.

आज परिस्थिती खूप बदलली आहे. दरवर्षी लाखो पर्यटक अंदमानला राष्ट्रीय तीर्थस्थान म्हणून भेट देतात. सेल्युलर जेलला भेट देऊन क्रांतिकारकांना भावपूर्ण श्रद्धांजली वाहतात. अंदमानमधील समुद्रातून जाताना जागोजागी फ्लाईंग फिश दिसतात.

---